दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२० मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 20 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 257 | Pages 4 | Rate 4 Rs


## विधानपरिषदेच्या निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादीत हालचाली

**मुंबई**–विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १६ जागांसाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच राज्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जूनला मतमोजणी पार पडणार आहे. एकूण १७ जागांसाठी निवडणूक होत असली तरी त्यातील एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे आणि रायगड–रत्नागिरी या दोन महत्त्वाच्या जागांवर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. पक्षामध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांनी हालचाली वाढवल्या असून नेतृत्वाच्या भेटीगाठींना वेग आला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीमध्ये सध्या अंतर्गत लॉबिंगचा जोर वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.पुणे विधानपरिषदेच्या जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. या जागेसाठी माजी आमदार सुनील टिंगरे, विक्रम काकडे, रमेश अप्पा थोरात, विलास लांडे आणि नाना काटे यांची नावे चर्चेत आहेत. प्रत्येक इच्छुकाने पक्षश्रेष्ठींकडे आपापली ताकद दाखवण्यास सुरुवात केली आहे.

# इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळावर वार्षिक १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे.या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते.तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई–बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.



# विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**धाराशिव । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने, ( उस्मानाबाद–लातूर–बीड )स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद द्वैवार्षिक निवडणूक–२०२६ कार्यक्रमाची घोषणा केली आहे. याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली.

निवडणुकीची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी २२ जून



२०२६ रोजी होईल. निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ रोजी पूर्ण करण्यात येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिली.

# शेतकऱ्यांना डिझेल नाकारून टिप्परांना मुभा?

## सादोळा रोडवरील समर्थ पेट्रोलियम विरोधात संताप

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

सादोळा रोडवरील समर्थ पेट्रोलियम या पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे डिझेल देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप होत आहे. दुसरीकडे वाळू व मुरमाच्या टिप्परांना मात्र कोणतीही अडचण न आणता डिझेल पुरवठा सुरू असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे.

शेतीची नांगरणी, मशागत व इतर शेतीकामांसाठी डिझेल घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना वारंवार नकार दिला जात असल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरला डिझेल नाही, पण टिप्परांना मोकळीक असा सवाल आता परिसरात उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शेती हाच ग्रामीण भागाचा कणा असून पेरणी, नांगरणी व इतर अत्यावश्यक कामांसाठी डिझेल मिळणे गरजेचे आहे. मात्र पंप प्रशासनाकडून शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले जात असून, आर्थिक फायद्यासाठी टिप्पर वाहनांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे.

या प्रकरणाची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन चौकशी करावी व शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.याविरोधात लवकरच निवेदन देण्यात येणार असून, पंपासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते लहू तात्या सोळंके यांनी दिला आहे. शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही. प्रशासनाने तात्काळ चौकशी करून कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.




# अपिलीय अधिकारी अभिमान राठोड सुनावणी साठी गैरहजर!

## माहिती अधिकार कायद्यासह नागरिक आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा अवमान–अक्षय गोटेगावकर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

पंचायत समिती,केज कार्यालयातील अधिकारी अभिमान राठोड यांनी माहिती अधिकार कार्यकर्ते यांना वेळोवेळी टाळाटाळ केलेली आहे, सुनावणी घेण्यासाठी टाळाटाळ करणे सुनावणीचे पत्र न काढणे,पत्र न काढता कॉल करून सांगणे की तुमची सुनावणी आहे तुम्ही सुनावणीसाठी हजर राहा,आणि स्वतः अपील अधिकारी अभिमान राठोड गैरहजर राहतात याचा प्रत्यक्षदर्शी पुरावा म्हणून दिनांक १९ मे २०२६ रोजी ठीक दहा वाजून दोन मिनिटांचा फोटो गुगलमॅप लोकेशन सह पाठवलेला आहे. लोकांच्या वेळेची,पैशाची नासधूस करणे राठोड यांच्या आवडीचा खेळ आहे.नागरिकांच्या भावनांची खेळणे, जबाबदारी पासून पळून जाणे,ग्रामपंचायत मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या, चोराच्या पाठीशी अप्रत्यक्ष उभे राहणे? सदर घटनेची रीतसर तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.अक्षय गोटेगावकर यांनी विभागीय माहितीआयुक्त व मुख्य आयुक्त पांडे साहेब यांच्याकडेपत्राद्वारे केली आहे.केज पंचायत समिती कार्यालयातील बेलगाम मुजोर अपिलीय अधिकारी अभिमान राठोड यांच्यावर सक्त कारवाई होणे गरजेचे आहे.कारवाईची नोंद राठोड यांच्या सेवा पुस्तिकात व्हावी अशी मागणी सचिवांकडे केली आहे असे त्यांनी सांगितले आहे.



# जेएनपीएचे चेअरमन गौरव दयाळ यांचे महेंद्रशेठ घरत यांनी केले अभिनंदन!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उरण येथील सुप्रसिध्द जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण या बंदराचे (जेएनपीए) चेअरमन म्हणून गौरव दयाळ यांची नियुक्ती झालेली आहे. गौरव दयाळ हे २००४ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे जागतिक पातळीवर कामगारांचे नेतृत्व करतात. त्यामुळे जेएनपीएचे चेअरमन गौरव दयाळ यांची नुकतीच भेट घेऊन महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी त्यांनी त्यांच्याशी संवाद साधून जेएनपीएतील कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा केली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संवाद साधण्यात आला. यावेळी किरीट पाटील आणि अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नांना मोठे यश

## प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा–४ अंतर्गत निधी मंजूर; ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

### गेवराई तालुक्यातील 'एमडीआर–२० ते यमगरवाडी' रस्ता कामाला मंजुरी!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा आणि दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यासाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तालुकयातील ङ०२१ एमडीआर–२० ते यमगरवाडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा–४' (PMGSY-खत) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. बीडचे खा. बजरंग सोनवणे यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्नांना यामुळे मोठे यश आले असून, या रस्त्यासाठी १ कोटी ३७ लक्ष २९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने (नवी दिल्ली) १८ मे २०२६ रोजी या कामाला अधिकृत मंजुरी दिली असून, यामुळे परिसरातील ग्रामस्थांची अनेक वर्षांची मोठी अडचण दूर होणार आहे. गेवराई तालुक्यातील एमडीआर–२० ते यमगरवाडी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेण्यासाठी, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण व्हावे, अशी आग्रही मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात होती.ग्रामस्थांची हीच गरज ओळखून खासदार बजरंग सोनवणे यांनी दिल्ली दरबारी आणि संबंधित मंत्रालयाकडे या रस्त्याच्या मंजुरीसाठी विशेष पाठपुरावा केला होता. अखेर काल, १८ मे रोजी केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने या कामावर मंजुरीची मोहोर उमटवली. या एकूण १.४०० कि.मी. अंतराच्या रस्त्याचे काम आता पूर्णपणे दर्जेदार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केले जाणार आहे.

ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल तर तिथले रस्ते सक्षम असणे गरजेचे आहे. यमगरवाडी रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. यासाठी मी वैयक्तिक पातळीवर सातत्याने केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे पाठपुरावा करत होतो. अखेर या प्रयत्नांना यश आले असून, १३७.२९ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मतदारसंघातील एकही गाव रस्त्याविना वंचित राहणार नाही, यासाठी माझे प्रयत्न सातत्याने सुरू राहतील.



### ग्रामस्थांकडून जल्लोष आणि आभार

**या रस्त्याला मंजुरी मिळाल्याची बातमी समजताच यमगरवाडी आणि परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. अनेक वर्षांचा रखडलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल गावकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांचे विशेष आभार मानले आहेत. रस्ता मंजुरीमुळे आता या भागातील वाहतूक सुसाट होणार असून, परिसराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. या कामाचे भूमिपूजन लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडणार आहे.**

# संपादकीय

## पर्यावरण रक्षण आणि आपण

सध्या पर्यावरणसंतुलन हा कळीचा विषय झाला आहे. पर्यावरणाच्या संतुलनासाठी प्रत्येकाने काहीतरी केले पाहिजे, पण काय हे नक्की कुणी सांगत नाही. हे काम माझे नसून कसे शासनाचे आहे, अशी सामान्यांची भावना असते, तर हरितकर वसूल करून आहे त्या गोष्टी तशाच चालू ठेवण्याकडे शासनाचा कल! इकोफ्रेंडली, निसर्गमित्र असे भारदस्त शब्द वापरले की कसे कृतकृत्य झाल्यासारखे वाटते! महानगरपालिका खूप ठिकाणी उंच खांबांवर पाट्या लावतात 'नका करू वृक्ष–तोड, पृथ्वीचा होईल बिमोड.' या पाट्या तयार करण्यासाठी किती पर्यावरणाचा नाश झाला असेल!ज्युरांग पार्क, सिंगापूर येथे एक उ द्बोधक मजकूर असलेली पाटी लावली आहे, खरोखर महाकाव्य ठरावे अशी! 'जेव्हा शेवटचा वृक्ष कापला जाईल, जेव्हा शेवटचा मासा जाळ्यात सापडेल, जेव्हा शेवटची नदी विषमय होईल, तेव्हा माणसाला कळेल की पैसा खाता येत नाही!' विकासप्रकल्प गरजेचे आहेत, यात कोणतीही शंका नाही, पण ते करताना निसर्गाचा ऱ्हास कमीतकमी कसा होईल, याचा विचार केलाच पाहिजे.मालवण येथे विकासप्रकल्प राबवायचे होते, पर्यावरणावर खूप विपरित परिणाम होणार होता, म्हणून सबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत शासनाला कल्पना दिली असता संबंधित मंत्र्यांची वल्गना आठवत असेलच तुम्हाला. ते म्हणाले होते, 'आम्हाला विकास हवा आहे, तुमचे पर्यावरण समुद्रात बुडवा!' खरे आहे, साहेबांच्या विकासासाठी हे प्रकल्प चालू होणे महत्त्वाचे होते!पर्यावरण रक्षणासाठी स्वत:पासून सुरुवात करताना आपण आपल्या वापरातील मुख्यत्वे तीन गोष्टींच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न करू शकतो – प्लास्टिक, कागद, आणि ल्युमिनियम. या तिन्ही गोष्टी जीवनाच्या अविभाज्य गरजा ठरल्या आहेत. त्या तिन्ही आपण निसर्गातील घटकांपासून मिळवतो. या प्रक्रियेत निसर्गाचा काहीतरी ऱ्हास होणारच! बर, कोणत्याही एका वस्तूचा वापर कमी केल्यास त्याचा भार इतर दोन गोष्टींवर पडणार. ॲल्युमिनियमविषयी थोडा संभ्रम असू शकेल. रोजच्या वापरात अनेक पदार्थांची, औषधाची वेष्टने, फॉईल यासाठी ल्युमिनिअम वापरतात. या तीनही गोष्टींचा सम्यक वापर करणे, पुनर्वापर करणे, त्यावरील अवलंबित्व कमी करणे, हे तरी आपण करूच शकतो. नवे वृक्ष लावता नाही आले तरी आहे त्या वृक्षांची निगा राखू शकतो. एक उदाहरण– अमेरिकेत टिश्यू पेपरचा वापर इतका प्रचंड आहे की एक माणूस दर वर्षी तब्बल २५ किलो कागद वापरतो, त्यावरून उधळपट्टीची कल्पना यावी.प्लास्टिक उत्पादनाचा संबंध आपल्याशी कसा आहे, हा प्रश्न पडणे स्वाभावीक आहे. या गोष्टींचे उत्पादन करताना नक्की काय होते? तेलाच्या विहिरीतून, 'रिग'मधून तेल–मिश्रित चिखलच येतो. त्याला आपण 'क्रूड' ऑइल म्हणून संबोधतो. त्यावर प्रक्रिया करून पेट्रोल, डीझेल, रॉकेल, मशिनरीत वापरले जाणारे वंगण, इत्यादी तयार केले जातात. त्यासोबत जोडउत्पादन म्हणून मिथेन वायू मिळतो. त्यात कार्बन डाय ऑक्साइडपेक्षा २५ पट उष्णता धारण करण्याची क्षमता असते आणि तोच स्वयंपाकासाठी वापरला जातो तो गोबरगॅस म्हणून. याबरोबरच या प्रक्रियेत प्लास्टिक आणि इतर रसायने मिळतात.प्लास्टिक उत्पादनासाठी बाकी कोणताही पर्याय नाही. तेलविहिरी खणण्यासाठी पृथ्वीच्या पृष्ठभागापासून तीन ते पाच मैल खोल जावे लागते. कुशल मनुष्यबळ, अवजड यंत्रणा, वाहतुकीची साधने, त्यासाठी लागणारी ऊर्जा यांचा आपण कधी विचार तरी करतो का? बहुतेक तेल विहिरी वाळवंटात आहेत, पण वाळवंटे हे एक परिपूर्ण, जिवंत परिसंस्था आहेत; त्यांचा पर्यावरण रक्षणात महत्त्वाचा सहभाग आहे. खाणकाम करताना धातू किंवा क्रूड ऑइलच्या थरापर्यंत पोहोचण्याच्या आधी कोट्यवधी लिटरचा पाण्याचा थर असतो. त्याचा राक्षसी शक्तीचे पम्प लावून निचरा करावा लागतो.या सर्व पर्यावरणविघातक गोष्टींचा परिणाम कमी करण्यासाठी शासन अनेक गोष्टी करू शकते. जास्तीत जास्त इंधन मिळवणे, चांगल्या क्षमतेने चालणारी वाहने तयार करण्यास प्रोत्साहन देणे, इत्यादी. आपणही प्लास्टिकचा वापर विचारपूर्वक करणे, पुनर्वापर करणे, प्लास्टिकच्या फक्त टिकाऊ गोष्टी तयार करणे, इत्यादी. महत्त्वाचं म्हणजे प्लास्टिकची योग्य तहेने विल्हेवाट लावली पाहिजे. या गोष्टींचा विचार केल्यास प्लास्टिक सुद्धा इको–फ्रेंडली ठरू शकेल!ल्युमिनियम आणि कागद यांचा एकत्रित विचार करू. कागद अर्थातच वृक्षांपासून बनवतात, आणि ल्युमिनियम बॉक्साइट या रूपात खाणीतून मिळते. कागद निर्मितीत पाण्याचीही अतिरिक्त आवश्यकता असते. तोडलेली वृक्षसंपदा कारखान्यापर्यंत वाहून नेणे आणि कागद करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया यासाठी ऊर्जावापर होतोच. बॉक्साइट खाणींच्या उत्खननासाठी सुद्धा अवजड यंत्रणा लागते, ऊर्जा प्रचंड प्रमाणात लागते, आणि पुन्हा कारखान्यांत ते शुद्ध करण्यासाठी अतिप्रचंड प्रमाणात ऊर्जा वापरली जाते. या दोन्ही उत्पादनांमध्ये वृक्षतोड आलीच. बॉक्साइट खाणींवर असणारी जंगले अर्थातच नष्ट झाली. अनेक प्राणी, पक्षी, कीटक, आणि सूक्ष्मजीव यांचा अधिवास नष्ट झाला. नैसर्गिक आणि मोफत चालणारी वातानुकूलन यंत्रणा बंद पडली! जे वृक्ष भूगर्भजलाची पातळी राखण्यास कारणीभूत होते त्यांच्यावर गदा आली. वृक्ष आणखी एक अतिमहत्त्वाचे काम करतात. एक मोठा वृक्ष आपल्या उच्छ्वासाद्वारे प्रतिदिन १५० ते २०० लिटर पाणी वातावरणात सोडून हवेतल्या नद्या म्हणजे 'एरियल रिव्हर्स' तयार करतात! याच 'नद्या' घनता वाढल्यावर पर्जन्य तयार करतात. हेच वृक्ष प्राणवायूचेही कारखाने आहेत. याबरोबरच आपल्याला फुले–फळे यांचा अनिर्बंध पुरवठा करतात! खाणी या 'ओपन' स्वरूपात असतात. त्यामुळे कडेची जमीन तापते आणि त्यातले बाष्प कमी होते. वादळ–वाऱ्यांपासून नैसर्गिक तटबंदी करणारी जंगले नष्ट झाल्यावर वादळे दूरपर्यंत घुसून उरलेल्या निसर्गसंपदेला मारक ठरतात. हा पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आपण फक्त एकच करू शकतो – वापर गरजेपुरता आणि मर्यादित करणे.

# बोरीसावरगाव येथे विज्ञान आधारित कृषी निविष्ठा व्यवस्थापन जनजागरण अभियान संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**




दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथे विज्ञान आधारित कृषी निविष्ठा व्यवस्थापन विषयक समग्र जनजागरण अभियान अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वैजनाथ देशमुख होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाबीज अंबाजोगाईचे प्रक्षेत्र अधिकारी सचिन सोनवणे, कृषि विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे, कृषि अभियंता प्रमोद रेणापूरकर तसेच सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती डांगे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कृषि अभियंता प्रमोद रेणापूरकर यांनी आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतीमधील बियाणे, खते व औषधे यांसारख्या कृषी निविष्ठांचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी ट्रॅक्टरचा सुयोग्य वापर, सुधारित बैलचलित अवजारांचा वापर तसेच कार्यक्षम ऊर्जा वापर याविषयी जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, खरीप हंगामामध्ये बियाणे, खते व तननाशकांमध्ये बचत करून शाश्वत उत्पादन वाढीसाठी रुंद वरंबा–सरी टोकण यंत्राचा वापर, बैलचलित सौर आधारित फवारणी यंत्र, ट्रॅक्टरचलित फवारणी यंत्र तसेच ड्रोनद्वारे फवारणी यांसारख्या आधुनिक यांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे.महाबीजचे प्रक्षेत्र अधिकारी सचिन सोनवणे यांनी महाबीजच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या बीजोत्पादन कार्यक्रमाची माहिती देताना शेतकऱ्यांना बीजोत्पादनाद्वारे शेतीतील उत्पन्न वाढविण्याचे आवाहन केले. प्रत्येक गावामध्ये किमान २५ एकर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी महाबीजकडून सहकार्य करण्यात येत असून त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे यांनी जैविक खते व जैविक औषधांच्या वापराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आगामी खरीप हंगामासाठी बीजप्रक्रियेस उपयुक्त विविध निविष्ठा कृषि विज्ञान केंद्रावर उपलब्ध असून शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती डांगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे सांगितले.कार्यक्रमास गावातील युवक, प्रगतिशील शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशस्वी व्हायचे असेल तर शॉर्टकट नव्हे,सातत्य व गुणवत्तेला प्राधान्य द्या-प्रा.विलास रोडे

## परळीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि करिअर मार्गदर्शन सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**




जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कोणताही शॉर्टकट न शोधता विद्यार्थ्यांनी नेहमी गुणवत्तेला प्राधान्य दिले पाहिजे. मेहनत, सातत्य आणि गुणवत्तेप्रती असलेली बांधिलकी यांमुळेच यश संपादन करता येते, असे प्रेरणादायी प्रतिपादन भीमजयंती महोत्सव समितीचे प्रा. विलास रोडे यांनी केले.परळी भीमजयंती महोत्सव समिती आणि नालंदा फाउंडेशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. सोमवार सायंकाळी येथील लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, सम्राट अशोक विचार मंचाचे संयोजक प्रा. दासू वाघमारे तसेच प्रा. राम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा. विलास रोडे म्हणाले की, आज व्यवसायाभिमुख शिक्षणासह विविध क्षेत्रांत अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही क्षेत्र निवडले तरी त्यात सर्वोत्तम कामगिरी करण्याचा निर्धार ठेवावा. शिक्षणामुळे खरा माणूस घडतो आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. सध्या शिक्षण क्षेत्रात काही प्रमाणात बोगसगिरी वाढत असली तरी विद्यार्थ्यांनी त्यामुळे निराश न होता, आपली गुणवत्ता सिद्ध करून तिचा गौरव वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

याप्रसंगी प्रा. दासू वाघमारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक शैक्षणिक प्रवासाचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि जिद्दीच्या बळावर स्वतःची प्रगती साधावी, असे आवाहन केले.

प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, वेळेचे महत्त्व न ओळखणारी व्यक्ती प्रगती करू शकत नाही. करिअर घडविताना वेळेचे अचूक नियोजन आवश्यक असून विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल मीडियाचा मर्यादित वापर करावा. वयाच्या या टप्प्यावर काही वर्षे मनापासून मेहनत घेतल्यास भविष्य उज्ज्वल घडेल. यशासाठी गुणवत्ता, कौशल्य, प्रबळ इच्छाशक्ती आणि इंग्रजी संवादकौशल्य अत्यंत महत्त्वाचे असून बदलत्या जगासोबत स्वतःत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी करावा, असे नमूद केले.

या सोहळ्यात दहावी व बारावीतील प्रत्येकी प्रथम पाच गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मानचिन्ह, गौरव प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ आणि प्रेरणादायी पुस्तक देऊन विशेष गौरविण्यात आले. तसेच उपस्थित इतर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनाही पुष्पगुच्छ व पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सिद्धार्थ जगतकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. नितीन व्हावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले. या सोहळ्याला परळी शहर व परिसरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्योतिराव फुलेंना महात्मा ही पदवी दिलेल्या वास्तूचे शासनाने स्मारक करावे

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**




मुंबई ११मे १८८८रोजी मुंबईतील कष्टकरी कामगार व बहुजन समाजाने त्यांना महात्मा ही पदवी देवून गौरवण्यात आले रावबहादुर विठ्ठल वंडेकर नारायण मेघाजी लोखंडे यांच्या पुढाकाराने हा गुणगौरव उत्सव झाला कारण प्रवाहाच्या विरोधात व सनातन्यांच्या विरुध्द लढणारे ज्योतिराव फुले यांनी या कार्यासाठी अखंड महाराष्ट्र पिंजून काढला होता ११मे २०२६ रोजी या ऐतिहासिक घटनेला १३८वर्षे झाली म्हणून त्या वास्तूत महात्मा फुले यांची पगडी त्यांच्या संघर्षमय जीवनाचा इतिहास पुस्तक रुपाने समाजा समोर मांडून त्या ठिकाणी त्यांना फुले प्रेमी सामाजिक कार्यकत्यांच्या वतीने १३८वा उत्सव दिन साजरा करण्यात आला.

ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस कामगार नेते श्री सागर तायडे अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना व सुरेश ढोबळे सरचिटणीस मुंबई देशस्थ मराठा ज्ञाति धर्मसंस्था मांडवी कोळीवाडा यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन पगडीस पुष्प अर्पण करण्यात आले.या प्रसंगी सुदाम गाडेकर गुणवंत कामगार पुरस्कार सन्मानित (नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विचार मंच अध्यक्ष )श्रीकांत माळी सामाजिक कार्यकर्ते सावता माळी भुवन भायखळा, सदानंद मंडलिक अखिल भारतीय म फुले समता परिषद मुंबई अध्यक्ष, श्री सुधिरशेठ कांडपिळे अध्यक्ष फुल माळी समाज पनवेल, गोपिनाथ लोखंडे (नारायण मेघाजी लोखंडे यांचे वंशज पणतू)पनवेल, श्री राहूल काळे खजिनदार मुंबई देशस्थ मराठा ज्ञाति धर्मसंस्था, श्री जगन्नाथ कुदळे सा कार्यकर्ते, यशवंत ओव्हाळ मा अधिक्षक आय् ए एस् टेनिंगसेंटर, आंबेडकर चळवळीचे जेष्ठ नेते नवनीत सिनलकर, सुरेश कांबळे मांझगाव सामाजिक संघटना, वामन गारडे संत शिरोमणि सावता माळी मंडळ कोपरखैरने, नवी मुंबई किसन काळे विनोद कदम हेमंत वायाळ प्रशांत वारुळे ज्ञानेश्वर सोलाट लक्ष्मण खामकर.या प्रसंगी सुदाम गाडेकर म्हणाले की ११मे १८८८साली महात्मा ही पदवी ज्योतिराव फुले यांना या वास्तूत मिळाली ती वास्तू पुण्यभूमी आहे मांडवी कोळीवाडयास ऐतिहासिक वारसा आहे. रघुनाथ महाराज ज्योतिराव फुले यांच्या विचाराचे समकालीन दानशूर जनाबाई रोकडे माधवराव रोकडे यांचे सत्यशोधक चळवळीला योगदान आहे केंद्र सरकार महाराष्ट्र शासन ज्योतिराव फुले यांची द्विजन्मशताब्दि जन्मो उत्सव साजरा करित आहे. महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारने या निमित्ताने महात्मा पदवी भूमी ओतूर ता जुन्नर पुणे येथील फुले दांपत्याने सुरु केलेली शाळा आज ही तेथे मुली शिक्षण घेत आहे अशा वास्तू संरक्षित करुन त्यास हेरीटेज दर्जा देवून उचित स्मारक करावे जेणे करुन भावी पिढीला हा इतिहास माहित होईल भविष्या त्यातून आदर्श समोर राहिल त्यातून सामाजिक वसा व वारसा जोपासला जाईल अशी उत्सव साजरा करताना मागणी करण्यांत आली.

मुंबई देशस्थ मराठा ज्ञाति धर्मसंस्था मांडवी कोळीवाडा यांनी ही ऐतिहासिक जागा उपलब्ध करून मोलाचे सहकार्य केले संस्थेचे सरचिटणीस श्री सुरेश ढोबळे यांना महावस्त्र श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला तसेच त्यांनी पण मान्यवरांचा सन्मान केला या कार्यक्रमा निमित्ताने कार्यकर्त्यांना सामाजिक जाणीव होवून महात्मा फुले यांच्या कार्यातून प्रेरणा मिळेल अशी भावना व्यक्त केली श्रीकांत माळी यांनी सर्वांचे आभार मानले.

# गेट वे ऑफ इंडिया चा बेस्ट थांबा स्थलांतरित केल्यास विरोध करु,प्रसंगी बस खाली झोपू–नितीन नांदगावकर

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

गेट वे ऑफ इंडिया परिसरातील बेस्ट चा मार्ग बदलून तेथील बसथांबा छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयासमोरील योग्य ठिकाणी स्थलांतरित करावा अशी मागणी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बेस्ट महाव्यवस्थापक सोनिया सेठी यांच्या कडे पत्राद्वारे केली होती.यावर हा बस थांबा स्थलांतरित केल्यास विरोध करु प्रसंगी बेस्ट खाली झोपू असा इशारा बेस्ट समिती सदस्य व शिवसेना उबाठा उपनेते नितीन नांदगावकर यांनी दिला.बेस्ट समितीची बैठक बेस्ट भवनात सोमवारी दि.१८ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती.त्या प्रसंगी नितीन नांदगावकर बोलत होते.

देशभरातील गरीब लोक गेट वे इंडिया बघण्यासाठी येत असतात.त्यांना दहा रुपयांत चर्चगेट तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पासून गेटवे ऑफ इंडिया बसचे प्रवास तिकीट आहे.याकडे नांदगावकर यांनी लक्ष्य वेधले.यावर बेस्ट अधिकार्यांकडे बेस्ट महाव्यवस्थापक यांनी खुलासा विचारला. त्यामुळे बेस्ट नफ्यात आहे दररोज १२०० प्रवासी या मार्गावरुन प्रवासी प्रवास करत असतात.तर शनिवारी, रविवारी व सुट्टीच्या दिवशी डबल डेकर बसेस सोडण्यात येतात ४३६ बसेस मधून बसफेर्यांमधून २४ हजार प्रवासी प्रवास करतात.व सरासरी १ लाख १७ हजार इतका महसूल प्राप्त होतो.तर सुट्टीच्या दिवशी हे प्रमाण वाढते. व एकुण ५९८ बसफेर्यामधून २८ हजार प्रवासी प्रवास करतात व सरासरी १ लाख ९८ हजार इतका महसूल उपक्रमास प्राप्त होतो.असे उत्तर प्रशासनाने दिले.यावर बेस्ट नफ्यात असताना ही सामान्य व आम जनतेची असल्याचे बेस्ट अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांनी मान्य केले.तर येथील शेअर टॅक्सी बंद करावी असे आदेश दिले.हा प्रस्ताव गुंडाळावा अशी जोरदार मागणी नितीन नांदगावकर यांनी केली.परंतू बेस्ट अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांनी या मागणीचा प्रस्ताव पूर्नविचारासाठी ठेवला.दरम्यान या चर्चेत बेस्ट समिती सदस्य सुनील गणाचार्य यांनी भाग घेतला होता.



# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे रोजी उरणसह देशव्यापी केमिस्ट बंद!

## 'केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन'चा इशारा; शासकीय कार्यालयांना दिली निवेदने

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या ऑनलाईन औषध विक्री धोरणाचा निषेध करण्यासाठी बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी उरण तालुक्यासह देशभरातील सर्व केमिस्ट दुकानदारांनी 'एक दिवसीय लाक्षणिक बंद' पुकारला आहे. ऑनलाईन औषध विक्रीमुळे अंमली पदार्थांसारखी नशा आणणारी आणि व्यसन जडवणारी औषधे सहज उपलब्ध होण्याचा धोका निर्माण झाला असून, याचा तरुण पिढीवर व समाजावर घातक परिणाम होऊ शकतो. या गंभीर समस्येकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हा देशव्यापी एल्गार पुकारण्यात आला आहे.

या बंदच्या पार्श्वभूमीवर, उरण येथील 'हॉटेल आनंदी' येथे *'उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन'*ची एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली.रायगड जिल्हा केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनचे अध्यक्ष लीलाधर पाटील आणि जिल्हा सचिव प्रवीण नावंदर यांच्या सूचनेनुसार, या बंद दरम्यान सर्वसामान्य नागरिकांचे व रुग्णांचे हाल होऊ नयेत, याची विशेष काळजी घेण्यात आली आहे. बंद काळात केवळ 'इमर्जन्सी पेशंट' (अतितातडीचे रुग्ण) यांच्यासाठीच औषध पुरवठा सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती असोसिएशनतर्फे देण्यात आली.हॉटेल आनंदी येथील बैठकीत उरण तालुका अध्यक्ष उमाकांत पानसरे, सचिव राजेश्वर पाटील आणि तालुका ओबीसी प्रतिनिधी मनोज ठाकूर यांनी उपस्थित सर्व सभासदांना या आंदोलनाचे गांभीर्य पटवून देत सविस्तर मार्गदर्शन केले. पदाधिकाऱ्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत तालुक्यातील सर्व केमिस्ट सभासदांनी या बंदला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला. बैठकीच्या शेवटी सर्व औषध विक्रेत्यांनी 'केमिस्ट एकता जिंदाबाद' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.



> ऑनलाईन औषध विक्रीमुळे समाजाचे आरोग्य धोक्यात येत असून, या जनहितार्थ लढ्यात नागरिकांनीही केमिस्ट बांधवांना सहकार्य करावे.
> –उरण तालुका केमिस्ट असोसिएशन

**प्रमुख शासकीय कार्यालयांना दिली निवेदने**

या बंद आंदोलनाची अधिकृत माहिती आणि जिल्हा असोसिएशनचे निवेदन उरणमधील प्रमुख शासकीय कार्यालयांना सुपूर्द करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने:

आमदार कार्यालय, उरण
तहसीलदार कार्यालय, उरण
पोलीस स्टेशन, उरण

या सर्व ठिकाणी २० मे रोजीच्या भारत बंदबाबत अधिकृत निवेदने देण्यात आली आहेत. याप्रसंगी सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी केमिस्ट असोसिएशनला प्रशासनाच्या वतीने पूर्ण सहकार्य करण्याचे सकारात्मक आश्वासन दिले आहे. राष्ट्रीय जनहितार्थ पुकारण्यात आलेल्या या बंदला नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहकार्य करावे, असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

# वर्तकनगर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी: सीसीटीव्हीच्या मदतीने कार चोरट्याला ठोकल्या बेड्या, ४ गुन्हे उघड!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

वर्तकनगर पोलिसांनी आपल्या उत्कृष्ट तपास कौशल्याचे प्रदर्शन करत एका अट्टल कार चोरट्याला अटक करण्यात यश मिळवले आहे. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेली 'इको' (ECCO) कार हस्तगत केली असून, सखोल चौकशीत त्याने आणखी ३ कार चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे. काही दिवसांपूर्वी वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक इको कार चोरीला गेली होती. या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण (Technical -nalysis) सुरू केले. या तपासात पोलीस कॉंस्टेबल (PC) सस्ते यांनी अत्यंत मोलाची भूमिका बजावली. त्यांनी सलग ४ दिवस अहोरात्र मेहनत घेत परिसरातील अनेक सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने विश्लेषण केले. या तांत्रिक तपासाच्या धाग्यादोऱ्यांवरून पोलिसांना आरोपीचा माग काढण्यात यश आले आणि त्यांनी आरोपीला बेड्या ठोकल्या.




आरोपीला ताब्यात घेऊन जेव्हा पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली, तेव्हा त्याने धक्कादायक कबुली दिली. सदर इको कारशिवाय त्याने इतर वेगवेगळ्या भागांतून आणखी ३ कार चोरल्याची कबुली दिली आहे. यामुळे वाहन चोरीच्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांनी चोरीच्या गाड्या हस्तगत केल्या असून आरोपीने हे गुन्हे कोणाच्या मदतीने केले, याबाबत वर्तकनगर पोलीस आता पुढील तपास करत आहेत.

गुन्ह्याचा अत्यंत चाणाक्षपणे आणि वेगाने छडा लावणाऱ्या वर्तकनगर पोलीस पथकाचे आणि विशेष मेहनत घेणाऱ्या पीसी सस्ते यांचे ठाणे पोलीस आयुक्तलयासह सर्व स्तरातून भरभरून कौतुक होत आहे

# देगलूर येथील अपंग प्रशिक्षण केंद्रात ३० जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर/नांदेड | प्रतिनिधी**

नांदेड दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांच्यामार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग, अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद, मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्ट्रीक डोमेस्टिक ऍप्लायसेंस, मोबाईल रिपेअरिंग ड सर्व्हिसिंग, फीटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरींग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस.ऑफीस, डेस्क टॉप पब्लिशिंग (DTP) कॉम्प्युटर अकाँटिंग व ऑफिस ऑटोमेशन व अगरबत्ती, खडु, धुप बनवणे इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे.



इच्छूक दिव्यांग, अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद मुला-मुलींनी किंवा पालकांनी ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, भायेगाव रोड, देगलूर जि. नांदेड येथे पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटावे. अधिक माहितीसाठी मो. ९९६०९००३६९, ९४०३२०७१००, ७३७८६४११३६ वर संपर्क साधावा, असे आवाहन कर्मशाळा अधिक्षक तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर यांनी केले आहे.

# मुंबई विमानतळावर एअर इंडियाच्या प्रवाशांचा खोळंबा; तब्बल तासभर विमानातच अडकले!

## ग्राउंड हँडलिंग एजन्सीच्या संपामुळे मनस्ताप; सामान मिळवण्यासाठीही ताटकळत उभे राहण्याची वेळ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (CSMIA) रविवारी प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. एअर इंडियाच्या हैदराबाद-मुंबई विमानातील प्रवाशांना विमान लँड झाल्यानंतरही तब्बल एक तास विमानातच ताटकळत राहावे लागले. विमानतळावर उतरल्यानंतरही बाहेर पडता न आल्याने प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला.मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडियाचे हैदराबादहून मुंबईत दाखल झालेले विमान धावपट्टीवर उतरल्यानंतर प्रवाशांना खाली उतरवण्यास कमालीचा विलंब झाला. तासभर विमानात अडकून पडल्यानंतर कशीबशी प्रवाशांची सुटका झाली; मात्र त्यानंतर दुसरा मनस्ताप सुरू झाला. प्रवाशांना आपले सामान (Luggage) मिळवण्यासाठीही बेल्टपाशी तासनतास प्रतीक्षा करावी लागली. यामुळे संतप्त प्रवाशांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.




**कामात अडथळा का आला? एअर इंडियाचे स्पष्टीकरण**

या संपूर्ण गोंधळानंतर 'एअर इंडिया' कंपनीने अधिकृत निवेदन जारी करून प्रवाशांची माफी मागितली आहे. विमानतळावरील एका तृतीय-पक्ष ग्राउंड हँडलिंग एजन्सीच्या (Third-party Ground Handling agency) कर्मचाऱ्यांनी अचानक पुकारलेल्या कथित संपामुळे हा गोंधळ उडाल्याचे कंपनीने म्हटले आहे. या संपामुळे एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसच्या सेवांवर थेट परिणाम झाला आणि विमानतळावरील दैनंदिन कामकाजात मोठे अडथळे निर्माण झाले. विमानतळावरील एअर इंडियाची विशेष टीम सध्या संबंधित यंत्रणांशी आणि एजन्सीशी सातत्याने समन्वय साधत आहे. निर्माण झालेली परिस्थिती लवकरात लवकर नियंत्रणात आणून प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. या प्रकरणाबाबत विमानतळ प्रशासनाकडून आणखी अधिकृत माहिती येणे बाकी आहे.

# शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावू देणार नाही खत टंचाईवर आ.कोहळीकरांचा संताप

## 'युरिया-डीएपीचा कृत्रिम तुटवडा केल्यास कुणालाही सोडणार नाही'; प्रशासन व व्यापाऱ्यांना थेट इशारा

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव | प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर असताना बाजारात युरिया, डीएपी खते आणि बियाण्यांच्या संभाव्य टंचाईमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर हदगाव येथे आयोजित आढावा बैठकीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी प्रशासन आणि खत विक्रेत्यांना अक्षरशः धारेवर धरले. शेतकऱ्यांच्या बांधावर खत पोहोचेपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असा आक्रमक इशारा त्यांनी दिला. दरवर्षी काही व्यापारी आणि दलाल खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट करतात. युरिया आणि डीएपीसाठी जादा दर आकारणे, तसेच 'लिंकिंग'च्या नावाखाली शेतकऱ्यांना नको असलेले साहित्य खरेदी करण्यास भाग पाडणे, असे प्रकार सुरू असल्याचा आरोप बैठकीत झाला. यावर बोलताना आमदार कोहळीकर म्हणाले, शेतकरी आधीच निसर्ग आणि कर्जामुळे अडचणीत आहे. त्यांच्या जिवावर कुणी बाजार मांडण्याचा प्रयत्न करू नये. हा प्रकार थांबला नाही तर संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल.

**बनावट बियाणे विकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा!**



बैठकीत निकृष्ट आणि बनावट बियाण्यांचा मुद्दाही चांगलाच गाजला. बनावट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे कुटुंब उद्ध्वस्त होते. त्यामुळे बाजारात फक्त प्रमाणित बियाण्यांचीच विक्री व्हावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत, अशा कडक सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या. सर्व शेतकऱ्यांना समान आणि पारदर्शक पद्धतीने खत वितरण व्हावे, यासाठी प्रशासनाने नियोजन करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या बैठकीला कृषी अधिकारी, व्यापारी, शिवसेना पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चेंबूरच्या श्री नारायणगुरु स्कूलचा सुवर्ण महोत्सव थाटात संपन्न!

## महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीने सोहळ्याची शोभा वाढली; नव्या इमारतीचेही लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

चेंबूर येथील नामांकित 'श्री नारायणगुरु स्कूल'चा सुवर्ण महोत्सव सोहळा काल अत्यंत उत्साहात आणि भव्य वातावरणात संपन्न झाला. गेल्या ५० वर्षांचा गौरवशाली शैक्षणिक प्रवास पूर्ण केल्याबद्दल आयोजित या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याला महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांनी प्रमुख अतिथी म्हणून हजेरी लावली होती. त्यांच्या गौरवशाली उपस्थितीमुळे या सोहळ्याची शोभा अधिकच खुलली आणि कार्यक्रमाला एक विशेष प्रतिष्ठा लाभली.

या सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून श्री नारायणगुरु महाविद्यालयाच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या अद्ययावत इमारतीचे लोकार्पणही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेच्या भावी प्रगतीसाठी शासनातर्फे आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमादरम्यान उपमुख्यमंत्र्यांनी संस्थेच्या गेल्या पाच दशकांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव केला. शिक्षण क्षेत्रात श्री नारायणगुरु संस्थेकडून सुरू असलेले कार्य उल्लेखनीय आहे. ज्ञानदानाचे हे पवित्र कार्य समाजाच्या सर्वांगीण विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, अशा शब्दांत त्यांनी संस्थेचे कौतुक केले आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उपस्थित अन्य मान्यवरांनीही संस्थेच्या ५० वर्षांच्या यशाचा आढावा घेत व्यवस्थापनाचे विशेष अभिनंदन केले.

या दिमाखदार सोहळ्याला खासदार राहुल शेवाळे, माजी आमदार तुकाराम काते, विभागप्रमुख अविनाश राणे, राजा चौगुले या राजकीय क्षेत्रातील प्रमुख नेत्यांसह संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री नारायणगुरु ट्रस्टचे अध्यक्ष एम.आय. दामोदरन, चेअरमन एन. मोहनदास, जनरल सेक्रेटरी ओ.के. प्रसाद यांच्यासह संपूर्ण शिक्षकवृंद, संस्थेचे माजी व विद्यमान विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण चेंबूर परिसरात या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याची आणि संस्थेच्या यशाची विशेष चर्चा रंगली आहे.



# विधान परिषदेच्या १७ जागांसाठी रणसंग्राम; १८ जून रोजी होणार मतदान; संख्याबळामुळे महायुतीचे पारडे जड

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

या राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. पावसाळी अधिवेशनापूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेतील रिक्त जागा भरण्याच्या हालचालींना वेग आला असून, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ जागांसाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जूनला मतमोजणी पार पडणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने या मतदारसंघांतील अनेक जागा रिक्त होत्या. संबंधित आमदारांचा कार्यकाळ संपूनही नव्या निवडणुका घेता आल्या नव्हत्या. त्यामुळे तब्बल दोन ते अडीच वर्षांपासून विधान परिषदेतील काही जागा रिक्तच राहिल्या होत्या. आता या निवडणुकांमुळे त्या जागा भरल्या जाणार आहेत. महाराष्ट्र विधान परिषदेतील एकूण ७८ सदस्यांपैकी २२ सदस्यांची निवड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून केली जाते. मात्र, निवडणूक घेण्यासाठी संबंधित मतदारसंघात किमान ७५ टक्के मतदारसंख्या अस्तित्वात असणे आवश्यक असते. ही अट पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राज्यातील सर्वात मोठा पक्ष भाजप विरुद्ध दुसऱ्या क्रमांकावर असणारा शिवसेना शिंदे गट यांच्यात ठाणे, कोकण, परभणी, हिंगोली यासोबतच सांगली आणि सातारा या जागांवर मोठ्या प्रमाणात रस्सीखेच बघायला मिळू शकतो. या जागांवर दोन्ही पक्ष आमनेसामने येऊन वाद होण्याची शक्यता आहे. मात्र या १७ जागांवर महाविकास आघाडी फक्त नावापुरती विरोधकाची भूमिका पार पाडेल. महाविकास आघाडीकडील संख्याबळ पाहता, मविआला एकाही जागावर विजय मिळवता येईल का? याबाबत शंका आहे. संख्याबळानुसार नागपूर, जळगाव, सोलापूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ याठिकाणी



भाजपची चांगली ताकद आहे. त्यामुळे इथून भाजपचे उमेदवार रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. तर सोलापूरमधून राजा राऊत यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यांना भाजपकडून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.

तर शिवसेना शिंदे गट ठाणे, कोकण – रत्नागिरी – सिंधुदुर्ग – रायगड या जागांवर निवडणूक लढण्याची शक्यता आहे. या जागांवर शिवसेना शिंदे गटाचं संख्याबळ अधिक आहे. मात्र इथं भाजपने दावा सांगितला तर शिवसेना शिंदे गटाची अडचण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे जागा वाटपाचा हा पेच महायुती कसा सोडवणार हे पाहणं देखील तितकंच महत्त्वाचं असणार आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून पुणे, सातारा – सांगली आणि आहिल्यानगरच्या जागेसाठी प्रयत्न केले जातील. अहिल्यानगरमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच संख्याबळ जास्त आहे. इथं राहुरी पोटनिवडणूक न लढल्यामुळे प्राजक्त तनपुरे यांना भाजपकडून उमेदवारी देण्याची दाट शक्यता आहे. परभणी–हिंगोलीमध्ये महायुतीत सर्वाधिक संघर्षाची चिन्हं आहेत. इथं महायुतीतील अंतर्गत संघर्षाचा फायदा महाविकास आघाडीला होण्याची शक्यता आहे. १७ पैकी ज्या जागांवर महाविकास आघाडी जिंकू शकते, अशी एकमेव जागा म्हणून या जागेकडे पाहिलं जात आहे. इथं महायुतीत ऐकी बघायला मिळाली तर महाविकास आघाडीची वाट आणखी अवघड ठरू शकते. जिल्हापरिषद निवडणुकीत भाजप विरुद्ध शिवसेना– राष्ट्रवादीमध्ये टोकाचा संघर्ष पाहायला मिळाला होता. आता विधान परिषद निवडणुकीत देखील असंच चित्र बघायला मिळू शकतं.

# उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूंचा गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत समावेश करा

## पीआरपीचे तालुकाध्यक्ष सतिश पांडवे यांची कृषीमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

राज्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शेतातील कामे करताना उष्माघातामुळे शेतर्कयांचे मृत्यू होत असून शासनाच्या कृषी विभागाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष सतिश पांडवे यांनी देगलूरचे उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना



ही शेतकरी कुटुंबांना संकट काळात आर्थिक आधार देणारी महत्त्वपूर्ण कल्याणकारी योजना आहे. मात्र या योजनेत उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूबाबत स्पष्ट तरतूद नसल्याने अनेक शेतकरी कुटुंबे मदतीपासून वंचित राहत आहेत.

सध्या राज्यात तीव्र उष्णतेची लाट असून अनेक भागांमध्ये तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी हळद, कांदा, भुईमूग आदी पिकांची काढणी तसेच खरिप हंगामपूर्व मशागतीची कामे करत आहेत. कडक उन्हात दीर्घकाळ काम करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत असल्याने शासनाने तातडीने या गंभीर प्रश्नाची दखल घेण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.उष्माघातामुळे होणाऱ्या शेतकरी मृत्यूंचा अपघात विमा योजनेत समावेश केल्यास मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळून मोठा दिलासा मिळेल, अशा आग्रही मागणीचे निवेदन नायब तहसीलदार विलास तेलंग यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे देगलूरच्या वतीने देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सतीश पांडवे, सूर्याजी पाटील जाधव, प्रा.निवृत्ती भागवत, किरण कांबळे, देवेंद्र कांबळे व गौतम वनंजे आदी उपस्थित होते.

# अर्धवट महामार्गावर टोल कशासाठी? संतोष पटकारेंचा सरकारला थेट सवाल

## खारपाडा टोलनाका तात्काळ बंद करण्याची मागणी; तीव्र आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा टोलनाका १५ मेपासून अचानक सुरू करण्यात आल्याने कोकणवासीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या आणि अर्धवट महामार्गासाठी टोल कशासाठी? असा थेट सवाल ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष संतोष पटकारे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्रक पाठवून ही टोल वसुली तातडीने बंद करण्याची मागणी केली आहे.



**१६ वर्षांपासून काम अपूर्णच!**

पळस्पे ते इंदापूर दरम्यानच्या ८४ किलोमीटर मार्गाचे रुंदीकरण २००९ पासून रडतखडत सुरू आहे. २०१४ मध्ये पूर्ण होणारा हा प्रकल्प अजूनही अपूर्ण आहे, ज्यामुळे प्रकल्पाचा खर्च ९२२ कोटींवरून १२०० कोटींवर गेला आहे. निकृष्ट दर्जाचे काम आणि खड्ड्यांमुळे आजवर शेकडो अपघात होऊन हजारो प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे, असे पटकारे यांनी नमूद केले.

**खारघरच्या धर्तीवर टोलमुक्ती द्या!**

स्थानिकांना विश्वासात न घेता सुरू झालेली ही वसुली अन्यायकारक आहे. खारघर टोलनाक्याप्रमाणेच खारपाडा येथेही खाजगी वाहनांना संपूर्ण टोलमुक्ती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.शासन व स्थानिक लोकप्रतिनिधींनी यावर तातडीने तोडगा न काढल्यास, महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे आणि महामार्ग संघर्ष समितीचे समन्वयक संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संतोष पटकारे यांनी दिला आहे.

# अधिक मासात जप,दान पूजा,वृत्त केल्याने पुण्य अधिक पटीने वाढते–अविनाश स्वामी लोणी

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

येणाऱ्या १७ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत अधिक मास असून हा महिना भगवान विष्णूंना अत्यंत प्रिय मानला जातो. या महिन्यात जप, दान, पूजा, वृत्त, सेवा केल्याने त्यांची पुण्य अधिक पटीने वाढते, असे शास्त्रात नमूद करण्यात आले असून धार्मिक कार्य अखंडपणे करावे, असे मत लोणी ता. देगलूर येथील प्रसिद्ध वेदशास्त्र अभ्यासक अविनाश वैजनाथ स्वामी यांनी व्यक्त केले आहे.



दर तीन वर्षांनी येणारा अधिक मास शुभ का अशुभ याबाबतीत चर्चा होत असून अविनाश स्वामी यांनी शास्त्राच्या आधारे माहिती सांगितली. ते म्हणाले हा महिना विष्णू लक्ष्मी उपासना करता श्रेष्ठ आहे. विष्णू सहस्त्रनाम व्यंकटेश स्तोत्र रामरक्षा, श्रीमद्भागवत , वगैरे पाठ वाचन केल्याने खूप पुण्य फळ मिळते. कारण जर तीन वर्षांनी रिक्त क्षय तिथी भरून निघते. यालाच अधिक मास म्हणतात व या महिन्यात महिनाभर एक भुक्त अथवा नक्त भोजन व देवासमोर अखंड दीप महिनाभर तांबूल दान व गंगा स्नान केल्याने पुण्य फळ मिळते. लक्ष्मी प्राप्ती होते. शक्य असेल तर अन्नदान, वस्त्रदान करावे. द्वादशी, पोर्णिमा, अष्टमी, नवमी, चतुर्दशी, अमावस्या, व्यतिपत, व महिन्यात श्रद्धेने अपुप म्हणजे अनारसे देवास, गाईस, गंगेला, गुरूंना, लेक जावई अतिथी गरजू लोकांना मदत दान केल्यास मोक्ष पुण्य प्राप्त होते जुने कामे चालू ठेवता येईल मात्र नवीन कामे, मोठ्या तीर्थयात्रा, लग्न, साक्षगंध, वास्तु , भूमिपूजन, वगैरे जमत नाहीत मात्र नित्यकर्म, पूजा, अर्चा, श्राद्ध, बाळास अन्नप्राशन, नामकरण, देवाची पुनर परिस्थावना , करता येईल दर तीन वर्षांनी येणार अधिक मास शुभ आहे. या महिन्यात जेवढे जमेल तेवढे जप नामस्मरण व सत्यनारायण पूजा करावी व कोणतीच शंका कुशंका न करता या महिन्यात पुण्य फळ प्राप्त करावे. फक्त नवीन कोणतेच काम सुरुवात करू नये, जुने सर्व कामे करता येतील असेही लोणी येथील अविनाश वैजनाथ स्वामी यांनी म्हणाले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत सख्या दोन भावांचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

पाथरी ढालेगाव ( रामपुरी ) फाटा परिसरात राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत रेनापुरी येथील दोन तरुण सख्या भावांचा जागीच मृत्यु झाला. सदरील घटना सोमवार (दि. १८) रोजी रात्री अकराच्या सुमारास घडली असुन या घटनेमुळे रेणापूरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मयत विशाल घडसिंगे वय २४ वर्ष



मयत रवींद्र घडसिंगे वय वर्ष २७

अधिक माहिती अशी की,माजलगाव तालुक्यातील पुनर्वसन भागातील रेणापुरी येथील रवींद्र शिवाजी घडसिंगे (वय २७) व विशाल शिवाजी घडशिंगे (वय २४) दोघे भाऊ (एम.एच.४४ ए.बी. २६२६) या क्रमांकाच्या मोटार सायकलवरून पाथरी कडून माजलगाव कडे येताना ढालेगाव ( रामपुरी फाटा ) – पाथरी दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर त्यांच्या मोटरसायकलला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. रक्त बंबाळ अवस्थेत दोघांनाही पाथरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र अपघात इतका गंभीर होता की,दोघांनाही रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यु झाला होता. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेमुळे रेणापूरी गावावर शोककळा पसरली असून, अज्ञात वाहनाचा तपास पाथरी पोलिस करत आहे.

# गजानन बिडकर राज्य स्तरीय पुरस्कार मूकनायक नॅशनल अवॉर्ड-२०२६ ने सन्मानित धर्माबाद येथे जंगी स्वागत,पत्रकारिता व समाजकार्यासाठी राष्ट्रीय पातळीवर गौरव

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

पत्रकारिता,समाजसेवा आणि जनजागृती क्षेत्रा तील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पुरोगामी पत्रकार संघ (भारत) चे तेलंगणा राज्याध्यक्ष तथा साप्ताहिक महिमा खादीचा चे मुख्य संपादक गजानन गंगाधरराव बिडकर यांचा नांदेड येथे राज्यस्तरीय सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना प्रतिष्ठेचा मूकनायक नॅशनल अवॉर्ड २०२६ जाहीर झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.

दैनिक वीर शिरोमणी तसेच दैनिक व साप्ताहिक नंदगिरीचा कानोसा यांच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य समारंभात हा गौरव सोहळा पार पडला. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते श्री.बिडकर यांना सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पहार प्रदान करून गौरविण्यात आले.गजानन बिडकर हे पत्रकारितेच्यामाध्यमातून वंचित,पीडित आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवूनदेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत.सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध जनहिताच्या प्रश्नांना वाचा फोडत प्रभावी जनजागृती केली आहे.त्यांच्या निःस्वार्थ, ध्येयवादी आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत हा राष्ट्रीय सन्मान जाहीर करण्यात आला.यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना गजानन बिडकर म्हणाले, हा सन्मान केवळ माझा नसून सत्य,समाजहित आणि जनजागृतीसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या प्रत्येक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांचा आहे.हा पुरस्कार पुढील कार्यासाठी अधिक प्रेरणा देणारा ठरेल.

**धर्माबाद येथे जंगी स्वागत व विशेष सत्कार**

नांदेड येथील सन्माना नंतर गजानन बिडकर यांनी धर्माबाद येथे सदिच्छा भेट दिली.या भेटीदरम्यान



साप्ताहिक नव्या युगाची वाटचाल चे मुख्य संपादक प्रेमसिंह इंदरसिंह चव्हाण आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संजय (बंटी) काडगेवार,सूर्यकांत हनमंते,समर्थ फोटो स्टुडिओचे संचालक सत्यनारायण पांचाळ तसेच पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.भेटी दरम्यान पत्रकारिता, सामाजिक कार्य,संघटन विस्तार,कौटुंबिक विषय तसेच समकालीन राजकीय घडामोडींवर सविस्तर चर्चा झाली. उपस्थितांनी गजानन बिडकर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**दोन राज्यांतील गौरवाचा दुहेरी आनंद**

महाराष्ट्रात राष्ट्रीय स्तरा वरील पुरस्काराची घोषणा आणि तेलंगणात पत्रकार संघटनेचे राज्याध्यक्ष म्हणून प्रभावी नेतृत्व या दुहेरी गौरवामुळे गजानन बिडकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पत्रकारिता, समाज सेवा व जनजागृतीच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडविण्याचा त्यांचा संकल्प अधिक दृढ झाला असून,आगामी काळात त्यांच्या कार्याचा विस्तार अधिक व्यापक पातळीवर होईल, असा विश्वास विविध स्तरांतून व्यक्त केला जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077